## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/११/२०१६

**१) पैसे न देण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून डोक्यावर दगडाने मारून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोन्द :—**

दिनांक २८/११/२०१६ रोजी ०७.३० वा. यातील फिर्यादी जयलाश किसन टांगले वय ४५ वर्ष, रा. सालेबर्डी यांनी आरोपीला प्लस कंपनी मध्ये फिक्स डिपॉझीट ठेवलेल ५०,०००/रू ची मागनी केली असता, यातील आरोपीने तुझे कशाचे पैसे आहेत देत नाही तुझ्याने बनत असेल ते कर असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करून फिर्यादीचे डोक्यावर दगडाने मारून जखमी केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत इसम जखमी. : —**

दिनांक ०१/११/२०१६ चे १९.०० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादी इंन्दु प्रितीलाल बिसने वय ३२ वर्ष रा. सिहोरा हा पत्नीसह मोटार सायकलने डोंगरी वरून सिहोरा येथे डबल सीट जात असता यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हयीगयीने व लापरवाहीने ,निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल स्लिप होवुन मोटार सायकल वरून खाली पडुन डोक्याला मार लागुन स्वत: जखमी झाल्याने त्यास औषध उपचार करीता न्युरोन हॉस्पीटल नागपुर येथे भरती असुन उपचार सुरू आहे आज रोजी पो.स्टे धंतोली नागपुर जा.क्र. २०७६/१६ दि. ११/११/२०१६ चे कागज पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा बिझांडे यांचे अहवालावरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बावने पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद.:—**

दिनांक २८/११/२०१६ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी आपले ताब्यातील महिद्रामॅक्स गाडी एमएच २९ एन ९१०३ ही गाडी ही सार्वजनीक ठिकानी आमरोडवर येणा—या जाणा—या लोंकाना वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभे मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादीचे पोहवा कोडवते यांचे. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद.:—**

अ) दिनांक २८/११/०१६ रोजी १६.३० वा. दर. आरोपीने आपले ताब्यातील ऑटो हा सार्वजनीक ठिकानी आमरोडवर येणा—या जाणाज्या लोंकाना व वाहतुकीस अळथडा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादि पोशी जांभुळकर पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

ब) दिनांक २८/११/०१६ रोजी १७.३० वा. दर. आरोपीने आपले ताब्यातील ऑटो हा सार्वजनीक ठिकानी आमरोडवर येणा—या जाणाज्या लोंकाना व वाहतुकीस अळथडा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादि पोशी जांभुळकर पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २७/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर , मोहाडी ,पवनी, लाखांदुर व आंधळगाव येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारू कि. ११००/–रू. व ३ लिटर २४० मिलीलिटर देशी दारू कि. ९००/–रू तसेच जुगारातुन ६२०/–रू असा एकुण कि. २,६२०/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता